# होस्टेलच्या विश्वात घराची ओढ

म. टा. प्रतिनिधी कोल्हापूर

मी मूळची पुण्याची...पण शिक्षणासाठी कोल्हापुरात विद्यापीठात होस्टेलमध्ये राहते...करोनाचे संकट पुण्यात आले तेव्हापासून माझ्या मनाची घालमेल सुरू आहे. सुरुवातीला पुण्यात वाढते रुग्ण आणि त्यानंतर संचारबंदी यामुळे विद्यापीठाच्या होस्टेलमध्ये राहत असले तरी माझं सगळं लक्ष माझ्या कुटुंबाकडे लागून राहिले..... सांगलीत माझं घर आहे. सध्या सांगली ची परिस्थिती बघता कुटुंबियांच्या काळजीने माझं मन अस्वस्थ होतं.

## विद्यापीठ होस्टेल मधल्या मुलींनी व्यक्त केल्या भावना

अमित गद्रे



शिवाजी विद्यापीठाच्या होस्टेलमधे सध्या पाच मुली राहत असून होस्टेल हेच घर झाले आहे.

### स्वतः बनवतो जेवण

शिवाजी विद्यापीठातील वसतिगृहात सध्या पाच मुले आणि पाच मुली आहेत. हे सगळे कमवा व शिका योजनेमध्ये काम करत असल्यामुळे विद्यापीठात होस्टेलमध्ये थांबले आहेत. मेस बंद असल्याने यापैकी पाच मुली सर्वांचे जेवण बनवतात. विद्यापीठाच्या प्रशासनाने नेमून दिलेली काही काम करणे, स्वयंपाक बनवणे, घरच्यांशी संपर्कात राहणे, गप्पा आणि विरंगुळा शोधणे असा सध्या या सगळ्यांचा दिनक्रम सुरू आहे. सध्या तरी होस्टेल हेच त्यांचे घर बनले आहे.

सध्या करोनामुळे लागू केलेल्या संचारबंदी मुळे सगळे कुटुंबीय एकत्र आहेत, मात्र आम्ही 'कमवा व शिका योजने'मध्ये काम करत असल्यामुळे विद्यापीठाच्या वसतिगृहात राहत आहोत मनाने घराकडे अशी आमची अवस्था झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या होस्टेल मध्ये असलेल्या मयुरी, अपूर्वा, सुप्रिया, श्रद्धा, आणि निकिता यांनी व्यक्त केलेल्या भावना.

करोनाचे संकट गडद झाल्यानंतर विद्यापीठातील सर्व विभाग बंद करण्यात आले. सांगलीच्या मयुरी, निकिता आणि पुण्याची अपुर्वा सांगतात की आम्हालाही सूचना मिळाली मात्र त्याच वेळी आमच्या गावाकडे करोनाचा विळखा घट्ट झाला होता. हॉस्टेलच्या मैत्रिणी आपापल्या घरी गेल्या मात्र आम्हा पाचजणींसाठी आता हॉस्टेल हेच आमचं घर बनले आहे.

मयुरी मोहिते ही सांगली जिल्ह्यातली. सध्या ती विद्यापीठामध्ये नॅनो सायन्स या विभागात दुसऱ्या वर्षाला शिकत आहे. मयुरी कमवा व शिका या योजनेमध्ये काम करते आणि आपला शैक्षणिक खर्च सांभाळते. होस्टेलमध्ये विद्यार्थिनींना घरी जाण्याच्या सूचना विद्यापीठाने दिल्यानंतर मयुरीलाही वाटलं की आपणही घरी जावं पण विद्यार्थी भवनमधील काही कामे तसेच विद्यापीठातील 'कमवा शिका' योजनेअंतर्गत हातात असलेली काम सोडून घरी जाणं शक्य नव्हतं. तोपर्यंत सांगली जिल्ह्यात करोनाचा संसर्ग फोफावला आणि मयुरीची घरी जाण्याची वाट बंद झाली. सांगलीमधल्या बातम्या ऐकायला यायला लागल्या तशी मयुरीचे मन गेले अस्वस्थ होते. दिवसभर कामांमध्ये वेळ जातो मात्र संध्याकाळी कुटुंबियांच्या आठवणीने मयुरीचे डोळे पाणावतात.

पुणे जिल्ह्यातल्या दौंड येथील अपूर्व अपूर्वा ताकवणे एमसीएच्या पहिल्या वर्षाला शिकत आहे. हातात कमवा शिका योजनेचे काम असल्यामुळे तिला घरी जाणे शक्य नव्हतं. गेल्या पंधरा दिवसांपासून अपूर्वा सतत घरच्यांच्या काळजीने भावूक होते. दिवसभरात तीन ते चार वेळा फोन करून कुटुंबियांची विचारपूस करणे, संचारबंदी काळामध्ये काही अडचणी आल्यात का याबाबत बोलने हे सुरूच असतं.

सोलापूर जिल्ह्यातल्या बार्शी तालुक्यामध्ये वैराग या गावातील श्रद्धा कापसे ही विद्यापीठात एमबीए अभ्यासक्रमात शिकत आहे. लांबचा प्रवास आणि गावातील असुरक्षितता या पार्श्वभूमीवर श्रद्धाने होस्टेलमध्ये थांबण्याचा निर्णय घेतला. सांगलीची असलेली निकिता बाबर ही देखील एम एससीच्या पहिल्या वर्षात शिकत आहे. बातम्या आणि वर्तमानपत्रातून सांगलीची करोनाची स्थिती ऐकल्यानंतर ती रोज कुटुंबीयांच्या काळजीत हरवून जाते. आपण इकडे सुरक्षित आहोत मात्र आपले कुटुंबीय करोनाच्या विळख्यात आहेत हा विचार तिला रोज अस्वस्थ करतो. निगवे खालसा गावातील सुप्रिया सोहोनी ही संख्याशास्त्र विभागात शिकते आणि विद्यापीठाच्या हॉस्टेलमध्ये राहते. ती देखील कमवा व शिका या योजनेअंतर्गत काम करत असल्यामुळे तिलाही घरी जाता आले नाही.

# थोडक्यात

## 'चंदगडी बोलीतील शब्दसंग्रहाचे आवाहन'

चंदगड : चंदगडी बोलीचा यूजीसीपासून महाराष्ट्रातील अनेक विद्यापीठांच्या (शिवाजी विद्यापीठासह) अभ्यासक्रमात समावेश झाला आहे. त्या अनुषंगाने तयारीचा भाग म्हणून चंदगडी बोलीवरील दोन स्वतंत्र ग्रंथांचे काम अंतिम टप्प्यात आहे. ती लवकरच प्रकाशित होतील. हाती असलेल्या वेळेचा थोडा सदुपयोग करून चंदगडी बोलीचा शब्दसंग्रह आणि इतर वैशिष्ट्यांबाबत विचार करा. संपूर्ण कुटुंब एकत्र बसता त्यावेळी याबद्दल चर्चा करून तुम्ही योगदान देऊ शकता. या ग्रंथांमध्ये काही गोष्टी राहू नयेत यासाठी आपण आपला सहयोग देण्याचे आवाहन भाषाविकास संस्थेचे प्रा. नंदकुमार मोरे यांनी केले आहे. इयत्ता दहावीच्या कुमारभारती या पाठ्यपुस्तकातही समावेश होता. मात्र बाहेरील शिक्षक व विद्यार्थीसाठी अध्ययन-अध्यापनासाठी संदर्भ साधने उपलब्ध नाहीत. सध्या सर्वजण कोरोनामुळे घरीच आहेत. त्यामुळे वेळेचा सदुपयोग करून चंदगडी बोलीचा शब्दसंग्रह आणि इतर वैशिष्ट्यांबाबत माहिती पाठविण्याचे आवाहन प्रा. मोरे यांनी केले आहे.

# एमसीए अभ्यासक्रमावर संवाद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कंम्प्युटर सायन्स अधिविभागातर्फे मास्टर इन कंम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) अभ्यासक्रमाची आज ऑनलाईन बैठक झाली. अधिविभाग प्रमुख डॉ. आर. के. कामत यांनी नव्या अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने सहकारी प्राध्यापकांसमवेत चर्चा केली. एमसीएचा अभ्यासक्रम तीन वर्षाऐवजी दोन वर्षांचा होत आहे. त्याची अंमलबजावणी जूनपासून होत आहे. अभ्यासक्रमात बदल होऊ नये, याची काळजी घेतली जात आहे. संचारबंदीमुळे डॉ. कामत यांनी सहकारी प्राध्यापकांशी ऑनलाईन संवाद साधला. अभ्यासक्रम दोन वर्षांत काटेकोरपणे बसविला आहे का, याची माहिती घेतली. डॉ. आर. के. कामत, डॉ. के. एस. ओझा, डॉ. ऊर्मिला पोळ, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. कबीर खराडे, डॉ. शीतल झालटे, डॉ. स्मिता काटकर यांनी सहभाग घेतला.